International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# गोंड चित्रकला :भारताची राष्ट्रीय ओळख

**डॉ. नितीनकुमार जानबाजी रामटेके**
*रिसर्च असोशिएट, आयआयटी, दिल्ली.*
*Corresponding Author – डॉ. नितीनकुमार जानबाजी रामटेके*
DOI - 10.5281/zenodo.17656789

***सारांश (Abstract):***

*'गोंड चित्रकला' ही भारताच्या आदिवासी सांस्कृतिक वारशातील एक महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण कला आहे. मध्य भारतातील गोंड समाजाशी निगडित असलेली ही चित्रशैली निसर्गाशी असलेल्या त्यांच्या नात्याचं, श्रद्धेचं आणि जीवनदृष्टीचं दृश्य रूप मानली जाते. या कलेतील ठिपक्यांची रचना, लयबद्ध रेषा आणि निसर्गाशी जोडलेले विषय हे तिचे मुख्य वैशिष्ट्य आहे.*

*पूर्वी घरांच्या भिंतींवर साजऱ्या होणाऱ्या या चित्रकलेचा आधुनिक कॅनव्हास, कापड, कागद आणि डिजिटल माध्यमांपर्यंतचा प्रवास अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. जनगढ सिंह श्याम यांच्या कार्यामुळे गोंड चित्रकलेला नवीन दिशा मिळाली, तर त्यांच्या पाठोपाठ शर्मन श्याम, दुर्गाबाई व्याम, भज्जू श्याम यांसारख्या समकालीन कलाकारांनी या परंपरेला नव्या सामाजिक आणि जागतिक संदर्भातून समृद्ध केलं.*

*गोंड चित्रकलेला एप्रिल २०२३ मध्ये GI टॅग प्राप्त झाला, ज्यामुळे या पारंपरिक कलेला अधिक मान्यता, संरक्षण आणि जागतिक बाजारपेठेत स्थान मिळालं. NFT (Non-Fungible Token), डिजिटल गॅलरी, ऑनलाईन एक्झिबिशन्स आणि ग्राफिक पुस्तकांमधून ही चित्रशैली नव्या पिढीशी संवाद साधत आहे.*

*एकूणच, गोंड चित्रकला ही केवळ एक पारंपरिक चित्रशैली नसून, गोंड समाजाच्या सांस्कृतिक अस्मितेचं आणि निसर्गाभिमुख जीवनदृष्टीचं प्रभावी माध्यम आहे, जी काळानुरूप नव्या रूपांतरणातून अधिक व्यापक आणि सजीव होत आहे.*

***मुख्य शब्द : गोंड चित्रकला, GI टॅग , कॅनव्हास, NFT.***

## प्रस्तावना (Introduction):

भारतीय उपखंडाची सांस्कृतिक ओळख ही केवळ राजवटींनी वा धर्मांनी घडवलेली नाही, तर इथल्या विभिन्न समाजरचनेत जपल्या गेलेल्या परंपरांमधूनही ती उलगडते. या परंपरांमध्ये आदिवासी समाजांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. त्यांचा निसर्गाशी असलेला सजीव संवाद, जीवनपद्धतीतील साधेपणा आणि कलाकृतींमधून व्यक्त होणारी सांस्कृतिक अभिव्यक्ती — हे सगळं आजच्या सामाजिक संदर्भात नव्यानं समजून घेण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर 'गोंड चित्रकला' ही केवळ एक पारंपरिक शैली म्हणून न पाहता, ती गोंड समाजाच्या जगण्याच्या आणि जाणिवेच्या आरशातल्या प्रतिबिंबासारखी मानावी लागते.

गोंड चित्रकलेच्या मुळाशी असलेलं निसर्गाभिमुख दृष्टीकोन, तिच्या विशिष्ट रेषाशैली, ठिपक्यांची कलात्मक मांडणी आणि कथनक्षम आकृतिबंध यामध्ये एक वेगळीच सौंदर्यदृष्टी सामावलेली आहे. ही कला केवळ भिंतींवर साजरी होणारी सजावट नाही, तर गोंड जीवनशैली, श्रद्धा, लोककथा, पौराणिकता आणि सामाजिक मूल्यांची दृश्य रूपांतरे आहेत.

पारंपरिकतेपासून आधुनिकतेकडे झुकणाऱ्या या चित्रशैलीचा प्रवास, जनगढ सिंह श्याम यांच्यासारख्या कलाकारांपासून सुरू होऊन, दुर्गाबाई व्याम, भज्जू श्याम, शर्मन श्याम यांसारख्या नव्या पिढीपर्यंत पोहोचला आहे. आज ही चित्रकला कॅनव्हास, कागद, पुस्तकं, डिजिटल माध्यमं आणि NFT प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून जागतिक स्तरावर संवाद साधत आहे. २०२३ मध्ये मिळालेल्या GI टॅगमुळे गोंड चित्रकलेला केवळ सांस्कृतिक नव्हे, तर व्यावसायिक दृष्टीनेही नवी ओळख आणि संरक्षण प्राप्त झालं आहे.

या संशोधनाचा उद्देश गोंड चित्रकलेच्या मूळ स्वरूपाचा शोध घेत, तिच्या वर्तमानातील बदलते संदर्भ समजून घेणे आणि भारताच्या सांस्कृतिक पटावर तिचं स्थान अधोरेखित करणं हा आहे. गोंड समाजाचा धार्मिक व निसर्गाभिमुख दृष्टिकोन, समकालीन कलाकारांचे योगदान, आणि या चित्रकलेचा जागतिक स्वीकार — या साऱ्यांचा साक्षेपी अभ्यास करत, गोंड चित्रकलेची सजीव परंपरा अधिक व्यापकपणे समजून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**संशोधन उद्दिष्टे (Objectives):**

1. गोंड समाजाच्या धार्मिक व निसर्गाभिमुख दृष्टिकोनाचा अभ्यास
2. समकालीन गोंड कलाकारांचे कार्य आणि त्याचा प्रभाव विश्लेषित करणे
3. गोंड चित्रकलेला मिळालेल्या GI टॅगचा आणि मान्यतेचा आढावा घेणे
4. भारताच्या सांस्कृतिक ओळखीत या कलेचे स्थान शोधणे

**संशोधन पद्धती (Methodology):**

या संशोधनासाठी विविध स्तरांवर माहिती संकलन आणि विश्लेषणाची पद्धत वापरण्यात आली. सर्वप्रथम, गोंड चित्रकलेविषयी प्रकाशित झालेल्या शोधनिबंध, पुस्तके, मासिके व वृत्तपत्रांतील लेख यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. यामधून या कलेची पारंपरिक मुळे, सांस्कृतिक मोल, व सामाजिक संदर्भ समजून घेण्यास मदत झाली.

यानंतर, दुसऱ्या टप्प्यात, विविध सरकारी संकेतस्थळे, सांस्कृतिक संस्थांचे अहवाल, ऑनलाईन लेख, माहितीपट आणि डॉक्युमेंटरीज यांचा अभ्यास करण्यात आला. जनगड सिंह श्याम, दुर्गाबाई व्याम यांच्यासारख्या प्रसिद्ध कलाकारांच्या संदर्भ मुलाखती व लेखांच्या माध्यमातून त्यांच्या दृष्टिकोनाचीही नोंद घेण्यात आली. वरील सर्व स्रोतांतून मिळालेली माहिती विश्लेषित करून निष्कर्ष काढण्यात आले, जे या संशोधनाच्या आधारस्तंभ ठरले.

**संशोधन निरीक्षण :**

भारतातील आदिवासी समाज हा देशाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारशाचा एक अभिन्न भाग आहे. विशेषतः गोंड समाज, जो मध्य भारतात प्रामुख्याने मध्य प्रदेश, छत्तीसगड, आणि महाराष्ट्रातील काही भागात आढळतो, त्यांचं निसर्गाशी नातं अतूट आहे.

गोंड समुदायाचा इतिहास सुमारे १४०० वर्षांपूर्वीचा मानला जातो. 'गोंड' हा शब्द 'कोंड' या द्रविडी मूळ शब्दातून आलेला आहे, ज्याचा अर्थ 'हिरवा डोंगर' असा होतो. या समाजाची जीवनशैली निसर्गाशी जोडलेली असून, त्यांच्या लोककथा, देवतांची पूजा, शेती, नृत्य आणि चित्रकला यांतून ती प्रकट होते. गोंड चित्रकला मुख्यतः ठिपके, लयबद्ध रेषा, आणि निसर्गस्नेही आकृतींवर आधारित असते. झाडे, पक्षी, प्राणी, लोककथा आणि देवता – हे चित्र विषय ठरतात. चित्रकलेत विशिष्ट प्रकारच्या नमुन्यांचा (patterns) वापर होत असून, ती केवळ सौंदर्यदृष्टिकोनातून न पाहता एक सांस्कृतिक भाष्य म्हणून समजावी लागते.

गोंड चित्रकला ही मुख्यतः प्रधान गोंड समाजातून आलेली पारंपरिक चित्रशैली आहे. ही चित्रे पूर्वी घरांच्या भिंतींवर, विशेषतः सण, विवाह आणि धार्मिक विधी यावेळी रंगवली जात. या चित्रांमध्ये निसर्ग, प्राणी, पक्षी, फुलं, पाने, देवता आणि पौराणिक कथा चित्ररूपात साकारल्या जात.

गोंड समाजात चित्रकलेसाठी वापरले जाणारे रंग हे पूर्णपणे निसर्गातून घेतलेले असायचे. जंगलात सहज सापडणाऱ्या गोष्टींपासून हे रंग बनवले जायचे. उदाहरणार्थ, सेमलच्या झाडाची कोवळी हिरवी पाने चोखून हिरवा रंग तयार केला जात असे. गावातल्या मळवाटीत सापडणाऱ्या लालसर मातीतून तांबडा रंग मिळायचा. काही फुलांचा रस, काळसर रंगाचे दगड, झाडांचा गोंद—हे सगळं मिसळून इतर रंग बनवले जात. या रंगांना कोणतीही बाजारातून आलेली चमक नसायची, पण त्यात एक खास आत्मीयता असायची. चित्र हे केवळ सौंदर्य मांडण्यासाठी नव्हे, तर आपल्या निसर्गाशी असलेल्या नात्याचं आणि जगण्याच्या पद्धतीचं एक बोलकं प्रतीक असायचं.

नर्मदा खोऱ्याच्या दक्षिणेस वसलेले अमरकंटकचे जंगल, अचानकमार व्याघ्र प्रकल्प आणि त्यातील जैवविविधता — यांचा प्रभाव चित्रांमध्ये स्पष्ट दिसतो. फुलं, झाडं, पशुपक्षी, कीटक आणि पावसाचे चक्र — हे सारे त्यांच्या चित्रांचे घटक असतात.

**चित्रकलेचा कॅनव्हासवर प्रवास:**

१९७०च्या दशकात जनगढ सिंह श्याम हे पाटणगड (जि. डिंडोरी) येथून भोपाळला आले. तेव्हापर्यंत भिंतीवर काढली जाणारी ही चित्रकला त्यांनी कापड, कॅनव्हास आणि कागदावर आणली. ही एक कलात्मक क्रांती होती. त्यांनी पारंपरिक आकृती आणि कथा अधिक आधुनिक आणि सर्जनशील शैलीत मांडल्या.

त्यांच्या या नवनवीन प्रयोगशील शैलीला पुढे "जनगढ कलम" म्हणून ओळख प्राप्त झाली. त्यांनी आधुनिक रंगसंगती, लयबद्ध रेषा, ठिपके आणि विशिष्ट नमुने वापरून गोंड चित्रकलेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

गोंड चित्रकलेला अनेक महत्त्वाचे सन्मान मिळाले आहेत. १९८६ साली मध्यप्रदेश सरकारने या कलेला आणि कलाकारांना "शिखर सन्मान" देऊन त्यांच्या योगदानाची दखल घेतली. त्यानंतर १९८९ मध्ये पॅरिसमधील Magiciens de la Terre या प्रसिद्ध प्रदर्शनात गोंड कला सादर झाली, ज्यामुळे जागतिक पातळीवर या कलेला ओळख मिळाली. १९९८ मध्ये दिल्लीमध्ये "Other Masters" या प्रदर्शनातही गोंड कलाकारांची कामं लोकांना पाहायला मिळाली. नंतर २०१० मध्ये Sotheby's लिलावात गोंड चित्रकारांचे एक चित्र "Landscape with Spider" $31,250 (सुमारे 26 लाख 25 हजार रुपये)

या महागड्या किंमतीत विकले गेले, ज्यामुळे या पारंपरिक कलेला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली.

एप्रिल २०२३ मध्ये गोंड चित्रकलेला भारत सरकारच्या जिओग्राफिकल इंडिकेशन (GI) टॅगचा मान मिळाला. गोंड चित्रकलेला हा टॅग मिळाल्यामुळे या पारंपरिक आदिवासी कलेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मान्यता मिळाली आहे. या GI टॅगमुळे गोंड चित्रकलेची जागतिक बाजारपेठेत प्रसिद्धी वाढली आणि आणखी वाढत राहील, तसेच कलाकारांना त्यांच्या कलेच्या खरेदी-विक्रीत अधिक सुरक्षा आणि ओळख मिळण्यास मदत होईल. यामुळे पारंपरिक गोंड कला पुढील पिढ्यांपर्यंत जपली जाऊ शकते आणि नव्या स्वरूपातही तिचा प्रसार होण्यास मदत होईल.

**समकालीन गोंड कलाकार आणि वैशिष्ट्यपूर्ण योगदान:**

समकालीन गोंड कलाकारांमध्ये डिंडोरी जिल्ह्यातील पाटणगडचे रहिवासी शर्मन श्याम यांचा उल्लेख महत्वाचा आहे. त्यांनी आपल्या मोठ्या भावाकडून पारंपरिक गोंड चित्रकलेचे प्रशिक्षण घेतले असून, त्यांच्या काकांनी या चित्रकलेला भिंतीवरून कॅनव्हाससारख्या आधुनिक माध्यमावर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. शर्मन श्याम यांच्या चित्रांमध्ये अजूनही निसर्गाशी घट्ट नाते दिसून येते; त्यांचे काम फुले, पाने, प्राणी आणि लोककथा या विषयांवर आधारित असते, ज्यातून गोंड संस्कृतीची ओळख पटते.

दुसरी महत्त्वाची कलाकार दुर्गाबाई व्याम, ज्या मध्यप्रदेशमधील बुरबासपूरच्या मूळ रहिवासी आहेत, त्यांच्या नावानेही गोंड कला आणि समाजातील सामाजिक विषयांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. दुर्गाबाई यांना 'भीमायन' या ग्राफिक पुस्तकासाठी विशेष ओळख मिळाली आहे, ज्यात त्यांनी पारंपरिक गोंड शैलीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचे प्रभावी चित्रण केले आहे. त्यांच्या चित्रांमध्ये कथात्मकता आणि सामाजिक विचार स्पष्टपणे प्रतिबिंबित होतात. तसेच, दुर्गाबाई यांचे चित्रकारितेचे योगदान 'The Night Life of Trees', 'Sultana's Dream' अशा विविध प्रदर्शनांत आणि पुस्तकांतही दिसून येते, ज्यामुळे गोंड चित्रकलेला नव्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात व्यापक प्रेक्षक मिळाले आहेत.

**गोंड चित्रकलेचे आधुनिक रूप आणि व्याप्ती:**

गोंड चित्रकलेने कालांतराने भिंतींवरील पारंपरिक रूपातून प्रगती करून कॅनव्हास, कागद, कापड आणि अगदी डिजिटल स्क्रीनवरही आपले स्थान निर्माण केले आहे. पारंपरिक नैसर्गिक रंगांपासून ॲक्रेलिक आणि पोस्टर रंगांसारख्या आधुनिक रंगांपर्यंत या कलेचा विस्तार झाला आहे, ज्यामुळे कलाकारांना अधिक सर्जनशीलता आणि प्रयोग करण्याची संधी मिळाली आहे. व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहता, गोंड चित्रकलेने प्रदर्शनं, लिलाव, पुस्तकं, तसेच भिंतींच्या सजावटीसाठी आणि गृहसजावट वस्तूंमध्ये आपले स्थान मिळवले आहे. या क्षेत्रातील प्रमुख कलाकार भज्जू श्याम यांचे "The London Jungle Book" या पुस्तकाने जागतिक पातळीवर विशेष स्थान मिळवले आहे. याशिवाय, डिजिटलीकरणाच्या युगात सोशल मीडिया, ऑनलाइन गॅलरी आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून गोंड चित्रकलेचा प्रसार वेगाने होत आहे. डिजिटल वर्कशॉप्स, NFT (Non-Fungible Token) आणि वर्च्युअल एक्झिबिशन्समुळे ही कला नव्या पिढीपर्यंत सहज पोहोचत असून, त्यामुळे गोंड चित्रकलेचा

जागतिक संवाद आणि स्थान अधिक बळकट होत आहे.

**निष्कर्ष (Conclusion):**

गोंड चित्रकला ही केवळ एक पारंपरिक चित्रशैली नसून, ती गोंड समाजाच्या निसर्गाशी असलेल्या अतूट नात्याची, श्रद्धेची आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीची साक्ष आहे. आदिवासी समाजाची जीवनपद्धती, त्यांची देवता, लोककथा, शेतीवर आधारित जगणे – हे सर्व त्यांच्या चित्रांतून प्रभावीपणे दिसते. या चित्रांची वैशिष्ट्ये म्हणजे लयबद्ध रेषा, ठिपक्यांची मांडणी, निसर्गनिष्ठ आकृती आणि विशिष्ट शैलीतून कथन होणारी जीवनदृष्टी.

गोंड चित्रकलेचा प्रवास भिंतींवरून कॅनव्हास, कागद आणि कापडावर कसा झाला, यामध्ये जनगढ सिंह श्याम यांचं योगदान फार महत्त्वाचं ठरतं. त्यांनी केवळ माध्यम बदललं नाही, तर या कलेला आधुनिक भाषाशैलीही दिली. त्यांच्या नंतरच्या पिढीतील शर्मन श्याम, दुर्गाबाई व्याम, भज्जू श्याम यांसारख्या कलाकारांनी या परंपरेला पुढे नेताना नव्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भांचाही समावेश केला.

गोंड चित्रकलेची आधुनिक व्याप्तीही लक्षणीय आहे. आज ही कला केवळ भिंती किंवा गावांत मर्यादित राहिलेली नाही; तर ती आंतरराष्ट्रीय प्रदर्शनं, पुस्तकं, डिजिटलीकरण आणि NFT (Non-Fungible Token) च्या माध्यमातून नव्या पिढीशी नातं जोडत आहे. 'The London Jungle Book', 'भीमायन', 'The Night Life of Trees' यांसारख्या कलाकृतींमुळे गोंड चित्रकलेला एक स्वतंत्र, जागतिक ओळख मिळाली आहे.

एप्रिल २०२३ मध्ये मिळालेला GI टॅग हे या कलेच्या शाश्वततेचं आणि वैशिष्ट्यपूर्ण अस्मितेचं औपचारिक मान्यताप्राप्त उदाहरण आहे. यामुळे केवळ गोंड चित्रकलेचं नाव उजळलं नाही, तर कलाकारांनाही व्यावसायिक आणि सांस्कृतिक स्वरूपात अधिक सुरक्षित आणि सन्माननीय स्थान मिळालं आहे.

थोडक्यात, गोंड चित्रकला ही एक जिवंत परंपरा आहे – जी काळानुसार बदलते आहे, पण तिचे मूळ निसर्ग, श्रद्धा आणि समुदायाच्या जीवनशैलीशी अजूनही घट्ट जोडलेले आहे. ही केवळ चित्रकला नाही, तर गोंड समाजाच्या विचारविश्वाचं आणि सांस्कृतिक ओळखीचं प्रतिबिंब आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

**Books and Journal Articles:**

1. Jafa, M. A. (2018). *Gond Art: The Art of Storytelling*. National Book Trust, India.
2. Jain, J., & Sharma, N. (2014). *Gond Art: Tribal Tradition in Transition*. Niyogi Books.
3. Sethi, A. (2012). *Indigenous Art Forms of India*. Oxford University Press.
4. Sharma, D. (2015). Tribal Art and National Identity. *Journal of Cultural Studies, 45*(3), 201–220.
5. Vyam, D., & Vyam, S. (2011). *The Night Life of Trees*. Tara Books.


**Websites :**

6. Business Today. (2014, February 16). *Gond tribe's traditional art gets global recognition, selling at high prices.* https://www.businesstoday.in

7. DESIblitz. (2020, August 17). *Indian Gond Art and its Cultural Heritage.* https://www.desiblitz.com
8. Historified. (2025, July 1). *Gond Tribal Painting of Madhya Pradesh: From Sacred Rituals to Commercial Art.* https://historified.in
9. Indian Culture. (n.d.). *Gond Chitrakalaen.* https://indianculture.gov.in/hi/paintings/gaonda-caitarakalaaen/gaonda-caitarakalaaen
10. Indian Express. (2020, December 15). *Gond art: How a tribal art form is captivating the world.* https://indianexpress.com
11. Madhya Pradesh Tourism Blog. (2024, December 24). *The Journey of Gond Art: From Mud Walls to International Galleries.* https://www.mptourism.com
12. MashClap. (n.d.). *Gond Painting Renaissance: A Blend of Tradition and Modernity.* https://mashclap.com
13. Ministry of Tribal Affairs, Government of India. (n.d.). *Gond Art.* https://tribal.nic.in
14. Museum of Tribal Arts, Bhopal. (n.d.). *Gond Art and Culture.* https://museum.tribal.gov.in/art-culture.html
15. People Are Culture. (n.d.). *Gond Art: A Story in Dots and Lines.* https://www.peopleareculture.com/gond-art/
16. Statesman. (2025, January 6). *Mud walls to international galleries: The evolution of Gond art.* https://www.thestatesman.com
17. Textile Value Chain. (2021). *Evolution of Indigenous Gond Art.* https://textilevaluechain.in/in-depth-analysis/articles/evolution-of-indigenous-gond-art
18. The Indian Express. (2020, December 15). *Gond art: How a tribal art form is captivating the world.* https://indianexpress.com
19. Times of India. (2025, May 9). *CM lauds tribal art's global recognition.* https://timesofindia.indiatimes.com
20. Wikipedia. (2024). *Jangarh Singh Shyam.* https://en.wikipedia.org/wiki/Jangarh_Singh_Shyam
21. Wikipedia. (n.d.). *Bhajju Shyam.* Retrieved August 2025, from https://en.wikipedia.org
22. Wikipedia. (n.d.). *Durga Bai Vyam.* Retrieved August 2025, from https://en.wikipedia.org
23. Rural India Online. (n.d.). *Gond Art: Stories of the Forest and the Land.* https://ruralindiaonline.org/mr/article/gond-art-stories-of-the-forest-and-the-land-mr